नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत.

(अधिव्याख्याता, संगणक अभियांत्रिकी/संगणक विज्ञान(MCA),शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय)

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
***शासन निर्णय क्र.एससीटी-६५१०/(७५/१०)/तांशि-१,***
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.**
**दिनांक :-०४/६/२०१०**

संदर्भ:-:-महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे क्र.१५(२)(२११)/सात,दि.२६/३/२०१० चे पत्र.

**शासन निर्णय:-** महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत खालील उमेदवारांची अधिव्याख्याता, संगणक अभियांत्रिकी/संगणक विज्ञान(MCA),शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक सेवा,गट-अ(कनिष्ठ) या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकान्यात ते ज्या दिनांकापासून त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकृत करतील त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीसाठी स्थानापन्न नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | आयोगाने दिलेला गुणवत्ता क्रमांक | वर्गवारी | आयोगाची शिफारस | पदस्थापनेचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती वृषाली अशोक चक्करवार | १ | अराखीव(म) | अराखीव(म) वर्गवारीकरीता राखीव असलेल्या पदासाठी | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, **औरंगाबाद** येथे कंत्राटी अधिव्याख्यात्याची सेवा समाप्त करुन रिक्त होणा-या संगणक अभियांत्रिकी/संगणक विज्ञान(MCA) या पदावर. |
| २ | श्रीमती वर्षा दामोधर जाधव | २ | अ.जा. | अ.जा. वर्गवारीकरीता राखीव असलेल्या पदासाठी | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,**कराड** येथे रिक्त असलेल्या संगणक अभियांत्रिकी/संगणक विज्ञान(MCA) या पदावर. |
| ३. | श्रीमती महानंदा धोंडिबा माळकौठेकर | ३ | इ.मा.व.(म) | इ.मा.व. वर्गवारीकरीता राखीव असलेल्या पदासाठी | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,**कराड** येथे कंत्राटी अधिव्याख्यात्याची सेवा समाप्त करुन रिक्त होणा-या संगणक अभियांत्रिकी/ संगणक विज्ञान(MCA) या पदावर. |

२. उपरोक्त उमेदवारांपैकी राखीव पदावर शिफारस झालेल्या सर्व उमेदवारांची जात वैधता पडताळणी झाली असून त्यांचा जाती दावा वैध ठरविण्यात आलेला आहे.

३. उपरोक्त उमेदवारांपैकी अ.क्र.२ येथील उमेदवारांचा साक्षांकन नमुना पोलीसांकडून शासनास प्राप्त झालेला नाही.सदर उमेदवारांची नियुक्ती या आदेशातील परि.४(७) अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४. उपरोक्त उमेदवारांची अधिव्याख्याता, संगणक अभियांत्रिकी/संगणक विज्ञान(MCA),शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक सेवा,गट-अ(कनिष्ठ) या पदावर ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, नामनिर्देशनाने,निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे:-

१)उपरोक्त उमेदवारांची वेतनश्रेणी रु.८०००-२७५-१३५००/- अशी राहील.

२)सदर वेतनश्रेणीव्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता,घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.

३)उपरोक्त उमेदवारांना प्रथम वेतनवाढ परिवीक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिवीक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

४)उपरोक्त उमेदवारांचे परिवीक्षा कालावधीतील काम किवा वर्तणूक अयोग्य,अपेक्षित दर्जाचे अथवा अननुरुप असामाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यास अथवा सेवेतून कमी करण्यास पात्र ठरतील.

५)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१ /३९,दि.७/८/२००० अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी /वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. उपरोक्त उमेदवारानी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१ /३९,दि.१९/३/२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र **नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत** उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.जर त्यांनी विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.

६)उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती सरळ सेवाप्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

७)उपरोक्त नमूद क्र.२ येथील उमेदवारांची चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणी नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत पूर्ण करण्यात यावी अन्यथा सहा महिन्याचा कालावधी नंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

८)उपरोक्त उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा(वेतन) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावे.

९)परिच्छेद-१ मध्ये नमूद केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर निर्देशिलेल्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून **एक महिन्याच्या आत** तात्काळ रुजु व्हावे.सदर विहीत मुदतीत जर त्यांनी नियुक्ती स्विकारली नाही तर आयोगाने घेतलेल्या परीक्षेत त्यांनी मिळविलेल्या गुणवत्ताक्रमानुसार त्यांना अनुज्ञेय असलेली ज्येष्ठता मिळणार नाही.शिवाय प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही तर त्यांचे नांव,कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

१०)उपरोक्त उमेदवारांना वित्त विभाग,शासन निर्णय,क्रमांक:अंनियो-२००५/१२६/सेवा-४,दिनांक ३१/१०/२००५ अन्वये निर्धारित केलेली नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना(Defined Conttribution Pension Scheme) लागू राहील.

११)उपरोक्त उमेदवारांचे प्रचलित नियमानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ राहील.

१२)उपरोक्त उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

१३)उपरोक्त उमेदवारांनी नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसूचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

६. हे आदेश प्राप्त होताच संबधीत उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल संबधीत संस्थाप्रमुखांकडे सादर करावा.संस्थाप्रमुखांनी याबाबतचा अहवाल संचालकांमार्फत शासनास सादर करावा.

७. सदर उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि.भा.सोनवणे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक,तंत्रशिक्षण,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई(पत्राव्दारे)
संबधीत विभागीय सहसंचालक,तंत्रशिक्षण.
संबधीत संस्थाप्रमुख(वरील उमेदवारांच्या शैक्षणिक तसेच इतर मूळ प्रमाणपत्रांची तपासणी संस्थाप्रमुखांनी स्वत: करावी व सदर उमेदवारांस हजर करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल संचालक,तंत्रशिक्षण यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा.)
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा),१/२,मुंबई/नागपूर.
संबधीत जिल्हा कोषागार अधिकारी. (संचालक मार्फत)
संबधीत उमेदवार.
प्रत:-निवड नस्ती(तांशि-१)